MHAH080008032024

सोपान मुरलीधर लोहाटे वगैरे

वि.

पुष्पा वेणुनाथ शिंदे वगैरे

## नियमित दिवाणी दावा ३६७/२०२४ मधील निशाणी ४३ वरील आदेश

वादींनी सदरचा अर्ज दावा परिच्छेद क्र. १ मधील शेतमिळकतीची (गट नं. ११५/१ व ११५/२ व संपुर्ण गट क्र. ११५, मौजे – चिंचपुर खु., ता. संगमनेर, जि. अहमदनगर) मोजणी करण्यासाठी कोर्ट कमिशनर म्हणुन तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख, संगमनेर, यांची नेमणुक होणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश – २६ नियम ९ प्रमाणे दाखल केला आहे. सदर अर्जाचे पृष्ठर्थ वादी क्र. ३ याने त्याचे शपथपत्र (नि. ४४) अभिलेखावर दाखल केले आहे.

**वादीचे थोडक्यात कथन असे की**,–

२. दावा कलम १अ ही मिळकत वादी क्र. १ चे, दावा कलम १ब ही मिळकत वादी क्र. २ यांचे व दावा कलम १क ही मिळकत वादी क्र. ३ यांचे मालकीची आहे. दावा मिळकतीच्या पश्चिमेस प्रतिवादी नं. १ ते ३ यांचा ग.नं. ११५/३ व ११५/४, प्रतिवादी क्र. ७ व ८ यांचा ग.नं. ११७/२, पुर्वेला प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचा ग.नं. ११४/१, दक्षिणेला प्रतिवादी क्र. १ चा ग.नं. १२०/१ ही मिळकत असुन प्रतिवादी क्र. ६ ची ग.नं. १२१/१, पश्चिमेला व उत्तरेला प्रतिवादी क्र. ९ ते १५ यांची ग.नं. १०६/१ ही मिळकत आहे. दावा मिळकतीच्या पश्चिम बाजुला प्रतिवादी क्र. १ ते ३ हे दावा मिळकतीचा बांध फोड्डुन वादींना नेहमीच त्रास देतात. दावा मिळकतीची फाळणीपाटी व पोट हिस्सा झालेला नाही. परंतु का. तलाठी

यांनी ग.नं. ११५ चे चार पोट हिस्से केलेले आहेत. दावा मिळकतीची मोजणी करणेकामी वादी हे दिनांक ४/४/२०२४ रोजी भुमि अभिलेख कार्यालय, संगमनेर यांचेकडे गेले असता, भुमि अभिलेख कार्यालय संगमनेरचे अधिक्षक यांनी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची ग.नं. ११५/३ व ग.नं. ११५/४ या मिळकती दावा मिळकतीच्या पश्चिम बाजुला लगत असल्याने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची संमती घेण्यास सांगितले. त्यामुळे वादींनी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचेकडे संमती मागीतली असता, त्यांनी संमती दिली नाही. उलट दावा मिळकतीच्या बांधावरुन व हद्दीवरुन नेहमीच वाद करीत असतात. प्रतिवादी हे वादीचे दावा कलम १अ ते १क मधील मिळकतीचा बांध फोडुन नेहमीच त्रास देत आलेले आहेत. दावा कलम १अ ते १क या मिळकतीच्या पुर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर बाजुने प्रतिवादी हे दावा मिळकतीचा बांध फोडुन अतिक्रमण करीत आहेत. तसेच, प्रतिवादी यांचेकडे मनुष्यबळाचा जास्त भरणा असल्यामुळे दावा मिळकतीचे हद्दीवरुन नेहमीच वाद विवाद करतात. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे संमती शिवाय वादीला दावा मिळकतींची मोजणी करता येत नाही व ते मोजणी करणेकामी संमती देत नाहीत. प्रतिवादी हे दावा मिळकतीचा बांध फोडण्याची तसेच दावा मिळकतीत अतिक्रमण करण्याची धमकी वादींना देत असतात. वादी प्रतिवादी यांचेतील वाद हा दावा मिळकतीचे हद्दी संदर्भात असल्याने मोजणी झाल्यास त्यांचेतील वाद हा संपुष्टात येणार आहेत. त्यामुळे दावा मिळकतीची मोजणी उपअधिक्षक भुमि–अभिलेख, संगमनेर यांचे मार्फत करुन हद्दी खुणा निश्चित करुन प्रतिवादींनी किती क्षेत्रात अतिक्रमण केले, याचा स्पष्ट उल्लेख मोजणी नकाशात करणेकामी वादींनी विनंती केली आहे.

३. सदरकामी प्रतिवादी क्र. २, ३ व ९ ते १५ यांनी निशाणी ४५

येथे त्यांचे म्हणणे देवून वादींच्या अर्जातील कथन त्यांना मान्य व कबुल नसल्याचे सांगुन अर्जास विरोध केला आहे. त्यांच्या कथनानुसार, वादींचा अर्ज खरा व बरोबर नसून तो त्यांना मान्य व कबुल नाही. त्यांनी मान्य केले की, दावा कलम १ अ ही मिळकत वादी क्र.१ ची, १ब ही मिळकत वादी क्र.२ ची, १क ही मिळकत वादी क्र. ३ चे मालकीची आहे, दावा मिळकतीच्या पश्चिम बाजुला प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची गट नंबर ११५/३ व ११५/४ ही मिळकत आहे. त्यांनी पुढे कथन केले की, वादींनी मिळकतीचे वर्णन व मिळकतीच्या चर्तुःसिमा चुकीच्या दर्शविलेल्या आहेत. वादींनी दाव्यासोबत जोडलेला प्रत्यक्ष कब्जेवहीवाटीचा हातनकाशा त्यांना मान्य व कबुल नाही. वादी दाव्यात नमुद चुकीच्या चर्तुःसिमा अन्वये दावा मिळकतींची मोजणी करु पाहत आहे. त्यामुळे मोजणी चुकीचे पद्धतीने होवून प्रतिवादींचे कायदेशीर हक्कांवर गदा येवून प्रतिवादींची जमीन हडप करणेचा वादींचा कुटील डाव आहे.

४. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, दाव्यात व अर्जात वादीने नमुद केलेप्रमाणे बांधफोडी व अतिक्रमणाविषयी केलेली कथने याविषयी कोणताही पुरावा वादींनी दाखल केलेला नाही. वादी व प्रतिवादी क्र. ३ यांचे शेतजमिनींचे दरम्यान उत्तर–दक्षिण बांधहद्द असुन ती पुर्वीपासून जशी होती तशीच आजही जागेवर कायम आहे. सदर बांधहद्दीवर मोठी झाडे असून त्यामुळे प्रतिवादींनी बांध फोडण्याचा अगर कोरण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. तसेच गट नंबर १०६/१, वादींचा गट नं ११५/१ व ११५/२ यांचा कोठेही बांधहद्दीचा संबंध येत नाही, त्यामुळे सदर गटातील बांधहद्द फोडण्याचा व मोडण्याचा प्रश्नच येत नाही. त्यामुळे बांधफोडी व अतिक्रमणाविषयीची कथने वादीने शाबीत केल्याशिवाय सदरचा अर्ज मंजुर

करता येणार नाही. वादींनी सदर दाव्यात पुरावा गोळा करणेकामी सदरचा अर्ज दिलेला आहे. त्यामुळे वादींचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्यांनी केली.

५. वादीचे विधीज्ञ श्री व्ही. के. कांगणे यांचा व प्रतिवादींचे विधीज्ञ श्री एन. टी. मगर यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख व त्यावरील कागदपत्रे वाचली.

६. अभिलेखावर दाखल केलेला प्रस्तूतचा अर्ज, शपथपत्र, दस्तऐवज, दावा यांचे अवलोकनार्थ असे प्रथमदर्शनी दिसून येते की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा मिळकतींमधील कथीत अतिक्रमणाबाबत व शेतजमीनीच्या हद्दीच्या बांधावरुन वाद आहेत. तसेच, प्रस्तुत दाव्यात दावा मिळकती या मौजे – चिंचपुर खु., ता. संगमनेर येथील गट/सर्वे नं. ११५/१ व ११५/२ असुन, प्रतिवादी लगत शेतधारक आहेत. त्यांचे गट क्रमांक ११५/३ व ११५/४ असे आहेत. कथीत वाद हा अतिक्रमणाबाबत असल्याने संपुर्ण गट क्र. ११५ ची मोजणी करणे योग्य व उचीत होईल. तसेच, सदर संपुर्ण गट क्र. ११५ ची मोजणी करूण, हद्दी खुणा निश्चित केल्यास कोणाचेही नुकसान होणार नाही उलटपक्षी वादातील मुद्यांना न्यायीक तत्वावर उकल होण्यास व न्यायाचे समतोलाने न्यायदान करण्यास व उभयातांमधील वाद संपुष्टात येण्यास मदत होईल. माझे असे मत झाले आहे की, मोजणी झाल्याशिवाय वादींच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये कथीत अतिक्रमण केले आहे किंवा कसे, हे स्पष्ट होणार नाही. वर नमुद परिस्थितीमध्ये कोर्ट कमिशनर यांचे मार्फत दावा मिळकती व संपुर्ण गट क्र. ११५ ची मोजणी होणे न्यायीक दृष्ट्या आवश्यक व उचित असल्याने खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.–

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उपअधिक्षक भुमि–अभिलेख कार्यालय, संगमनेर, यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

३. कोर्ट कमिशनर यांना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी दावा मिळकतीची, म्हणजेच मौजे – चिंचपुर खु., ता. संगमनेर, जि. अहमदनगर येथील गट/सर्वे नं. ११५ ची पाहणी करून, सदर मिळकतीची मोजणी करून, प्रत्येक पोट हिश्श्यांची हक्क नोंद पत्राप्रमाणे क्षेत्र मोजुन, हद्दी खुणा निश्चित करून, कथीत अतिक्रमण निष्पन्न झाल्यास त्याबाबत स्पष्ट खुलासा असलेला अहवाल मोजणी नकाशासहीत पत्र मिळाल्यापासुन ६० दिवसांच्या आत सादर करावा.

४. वादींनी कोर्ट कमीशनर यांना सदर दावा मिळकतीचे सर्व दस्तऐवज उपलब्ध करून दयावेत.

५. वादींनी कोर्ट कमीशनर यांची नियमानुसार योग्य ती फी संबंधीत कार्यालयाकडे जमा करावी.

६. संबंधीत दिवाणी लिपीक यांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी कोर्ट कमिशनरचे पत्र पाठवावे.

KIRAN KRISHNARAO PATIL

Digitally signed by KIRAN KRISHNARAO PATIL
Date: 2026.02.27 17:10:46 +0530

ठिकाण : संगमनेर (के. के. पाटील)
दिनांक : १४/०२/२०२६ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
संगमनेर